साखर आयुक्तालय व त्यांचे नियंत्रणाखालील सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयातील अस्थायी पदे सन २०१९-२० साठी पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांकः ससाका २०१९/प्र.क्र.३२/२५ स

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: - २७.०२.२०१९

वाचा -

१) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक:- असंक-१००४/ प्र.क्र. १२ (भाग-२) / २००४/ विसु १, दि. ०४ ऑक्टोबर, २००४.

२) शासन निर्णय,सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्रमांक:-राजस-१००८/प्र.क्र.५३८/५-स, दि.५/५/२०११.

३) सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांचे पत्र क्र. आस्था/ कक्ष-१/ सुधा. आकृतीबंध/ पदेवाटप/२०११,दि.२८/१२/२०११.

४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक:-ससाका २०१३/प्र.क्र.६१/२५- स, दि.०५/०४/२०१३.

५) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक:-ससाका-२०१८/प्र.क्र.२४५/२५स, दि.१९.०९.२०१८.

६) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक जा.क्र. साआ/प्रशा-१/अस्थायी पदे/ प्र.क्र.१२३/४३३५/२०१९, दिनांक ०७.०२.२०१९.

७) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दि.२१.०२.२०१९

प्रस्तावना :-

उपरोक्त वाचा ५ येथील दिनांक १९.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये साखर आयुक्तालय व त्याखालील प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयांतील ११० अस्थायी पदे दि.०१.१०.२०१८ ते दि.२८.०२.२०१९ पर्यत चालू ठेवण्यास शासनाने मान्यता दिली आहे. आता साखर आयुक्त कार्यालयाने संदर्भाधीन वाचा ६ येथील पत्रान्वये सदर ११० अस्थायी पदे दिनांक ०१.०३.२०१९ पासून दिनांक २८.०२.२०२० पर्यत चालू ठेवण्यास मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत सदर ११० अस्थायी पदे दिनांक ०१.०३.२०१९ पासून दिनांक ३०.०९.२०१९ पर्यत चालू ठेवण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त वाचा- ५ येथील दिनांक १९.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये साखर आयुक्तालय व त्याखालील प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयांतील ११० अस्थायी पदे दिनांक २८.०२.२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाने मान्यता दिली होती. आता साखर आयुक्तालय व त्याखालील प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयातील सदर ११० अस्थायी पदे सोबत जोडलेल्या तक्ता "अ "व " ब " मध्ये दर्शविल्याप्रमाणे **दिनांक ०१.०३.२०१९ पासून दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत** पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात कार्यासन

(आस्था १) आणि कार्यासन (५ स) या कार्यासनांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांच्या आस्थापनेवरील व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. यानंतर सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याकरिता कालावधी वाढवून देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. कार्यासन (आस्था-१) आणि कार्यासन (५-स) यांनी प्रशासकीय विभागाच्या (खुद्द) आस्थापनेवरील पदांचा तसेच, त्यांच्या नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचा आढावा घेऊन , सुधारीत आकृतीबंधास प्रस्ताव तातडीने वित्त विभागास सादर करण्याचे नियोजन करुन त्वरित कार्यवाही करावी व सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याची दक्षता घ्यावी.

२. यावरील खर्च मागणी क्रमांक व्ही-२, २४२५, सहकार (०१)(०८) साखर आयुक्तालयाचे बळकटीकरण (२४२५१०५४) ०१ - वेतन ह्या लेखाशिर्षाखाली खर्ची दाखविण्यात यावा व सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरिता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हे आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दि.२१.०२.२०१९ अन्वये विभागास प्राप्त प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२७११५८४१६८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pramod Mankoji Valanj

Digitally signed by Pramod Mankoji Valanj
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation, Marketing and Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9e7fafe78ccbad1148295b75b2b4a0fc30e01ea267cb61e5d741e2bf211f323, cn=Pramod Mankoji Valanj
Date: 2019.02.27 15:35:02 +05'30'

(प्रमोद वळंज)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
३. कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. प्रधान महालेखा परिक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल - १, लेखा परिक्षा, महाराष्ट्र शासन, मुंबई.
७. महालेखापाल - १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. महालेखापाल-२ (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र शासन, नागपूर.
९. महालेखापाल - २ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

११.निवासी लेखाधिकारी, मुंबई.

१२.कोषागार अधिकारी, पुणे, कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अमरावती.

१३.वित्त विभाग (व्यय - २) / (अर्थसंकल्प - १९)/(विसू-१)/(आ.पु.क.)

१४.कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई

१५.सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१६.प्रादेशिक सहसंचालक (साखर)पुणे ,कोल्हापूर ,अहमदनगर ,औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अमरावती.

१७.सर्व अधिकारी /कार्यासने , सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई .

१८. अवर सचिव (का. ५ स)/(आस्था १), सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई .

१९. निवड नस्ती.२५-स संग्रहार्थ.

तक्ता "अ "

साखर आयुक्तांचे कार्यालयातील निर्माण केलेली पदे

अ.क्र	पदनाम	अस्थायी पदे
१	साखर आयुक्त भारतीय प्रशासन सेवा	१
२	संचालक (साखर) (रु.३७४००-६७०००+ ग्रेड पे रु.८८००)	१
३	सहसंचालक (साखर) (रु.१५६००-३९१००+ ग्रेड पे रु.६६००)	३
४	सहायक संचालक (साखर) (रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.४४००)	६
५	सहायक संचालक (कृषि) (रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.४४००)	१
६	कार्यकारी अभियंता (रु.१५६००- ३९१००+ ग्रेड पे रु.६६००)	१
७	लघुलेखक (निम्नश्रेणी) (रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.४३००)	६
८	कार्यालय अधिक्षक (रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.४३००)	५
९	सांख्यिकी सहाय्यक (रु.५२००-२०२००+ ग्रेड पे रु.२८००)	१
१०	मुख्य लिपिक (रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.४२००)	४
११	वरिष्ठ लिपिक (रु.५२००-२०२००+ ग्रेड पे रु.२४००)	१२
१२	कनिष्ठ लिपिक (रु.५२००-२०२००+ ग्रेड पे रु.१९००)	६
१३	लघुटंकलेखक (रु.५२००-२०२००+ ग्रेड पे रु.२४००)	१
१४	वाहनचालक (रु.५२००-२०२००+ ग्रेड पे रु.१९००)	२
१५	शिपाई (रु.४४४०-७४४०+ ग्रेड पे रु.१३००)	१
१६	झेरॉक्स यंत्र चालक (रु.४४४०-७४४०+ ग्रेड पे रु.१६००)	१
	एकूण पदे	**५२**

तक्ता "ब"

सात प्रादेशिक कार्यालयातील निर्माण केलेली पदे

अ.क्र	पदनाम	अस्थायी पदे
१	सहसंचालक (साखर) (रु.१५६००-३९१००+ ग्रेड पे रु.६६००)	७
२	उपसंचालक (साखर) (रु.१५६००-३९१००+ ग्रेड पे रु.५४००)	२
३	कृषि अधिकारी (रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.४३००)	६
४	सहकार अधिकारी (श्रेणी-१) (रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.४३००)	१
५	सहकार अधिकारी (श्रेणी-२) (रु.९३००-३४८००+ ग्रेड पे रु.४२००)	६
६	वरिष्ठ लिपिक (रु.५२००-२०२००+ ग्रेड पे रु.२४००)	६
७	कनिष्ठ लिपिक व टंकलेखक (रु.३०५०-४५९०+ ग्रेड पे रु.१९००)	५
८	लघुटंकलेखक (रु.५२००-२०२००+ ग्रेड पे रु.२४००)	५
९	शिपाई (रु.४४४०-७४४०+ ग्रेड पे रु.१३००)	१४
१०	वाहन चालक (रु.५२००-२०२००+ ग्रेड पे रु.१९००)	६
	एकूण पदे	५८

अस्थायी पदे

साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे	५२
(सर्व)प्रादेशिक सहसंचालक (साखर कार्यालय)	५८
एकूण	**११०**

****